मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल
बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२
www.newsexpressmarathi.com
» पुणे, पिंपरी-चिंचवड
» मंगळवार, दि. 29 जुलै 2025 | पान- 1

# देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाचा महापालिकेत समावेश करा

## मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांना साकडे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे आणि खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाचा पुणे महापालिकेत समावेश केल्याप्रमाणे देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाचा पिंपरी-चिंचवड महापालिकेत समावेश करण्याची मागणी मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्याकडे केली. त्यावर याबाबत राज्य शासनाने प्रस्ताव पाठवावा. हा प्रस्ताव आल्यास देहूरोडचा महापालिकेत समावेश करण्याची ग्वाही संरक्षण मंत्री सिंह यांनी दिल्याचे बारणे यांनी सांगितले.



खासदार श्रीरंग बारणे यांनी दिल्लीत संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची भेट घेतली. देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्ड परिसरातील नागरिकांना मुलभूत सुविधा पुरविण्यात कमी पडत आहे. त्यामुळे देहूरोडचा पिंपरी महापालिकेत समावेश करण्याची विनंती केली. खासदार नरेश म्हस्के यावेळी सोबत होते.

खासदार बारणे यांनी म्हटले आहे की, मावळ लोकसभा मतदारसंघात देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाचा समावेश आहे. देहूरोड छावणी ऐतिहासिक आहे. सैन्य, नागरिकांसाठी काम करित आहे. गेल्या काही वर्षांपासून या भागातील नागरिकरणात वाढ झाली आहे. लोकसंख्या वाढत असून नागरी सुविधांची मागणी वाढली आहे. सद्यस्थितीत देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाला या सुविधा पुरेशा प्रमाणात देणे अशक्य आहे. त्यामुळे देहूरोडचे पिंपरी महापालिकेत विलिनीकरण अत्यंत आवश्यक आहे. पुणे आणि खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाचा पुणे महापालिकेत समावेश केला आहे. त्याचप्रमाणे देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाचा पिंपरी-चिंचवड महापालिकेत समावेश करावा. त्यामुळे देहूरोड मधील नागरिकांना दर्जेदार सुविधा मिळतील.

पाणी, कचरा, वीज, ऑनलाइन सेवा मिळतील. याचा नागरिकांना लाभ होईल. देहूरोड भौगोलिककदृशष्ट्या पिंपरी-चिंचवडच्या जवळ आहे. देहूरोड छावणी आर्थिक संकटांचा सामना करित आहे. केंद्र सरकारकडून अपेक्षित आर्थिक सहाय्य मिळत नाही. त्यामुळे नियोजित विकास होत नाही. नागरिकांना मुलभूत सुविधा मिळत नाहीत. देहूरोडमधील नागरिकांचीही महापालिकेत समावेश करण्याची मागणी आहे. त्यामुळे देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाचा पिंपरी-चिंचवड महापालिकेत समावेश करावा.

---

# भर पावसाळ्यात चिखलीतील रस्त्यांच्या कामासाठी खोदाई

## सोनवणे वस्ती कॉर्नर हा मोठा चौक होणार; उन्हाळ्यात अतिक्रमण काढल्यानंतर रस्त्याचे काम सुरु

**पिंपरी | प्रतिनिधी**

परिसरातील सोनवणे वस्ती कॉर्नर हा मोठा चौक होणार आहे. उन्हाळ्यात अतिक्रमण काढल्यानंतर रस्त्याचे काम सुरु झाले आहे. भर पावसात स्टॉमवॉटर लाईन, ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम सुरु झाले आहे. रस्ता प्रकल्पाचे काम असल्याने पावसाळ्यात थांबवता येत नाही, नवीन रस्त्यासाठीची ही खोदाई असल्याने भर पावसातही काम सुरु राहणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.



पावसाळ्यात खोदाईच्या कामांना महापालिका आयुक्तांनी एकीकडे मनाई केली आहे. मात्र दुसरीकडे शहरभर सर्रासपणे खोदाई सुरु असल्याचे चित्र पहायला मिळते आहे. उन्हाळ्यात करावयाची कामे भर पावसाळ्यात केली जात आहेत. त्यामुळे रस्ता चिखलमय, वाहतूक कोंडी या समस्यांचा सामना करावा लागतो आहे.

मागील काही महिन्यापूर्वी राधा स्वामी सत्संग समोर ड्रेनेजलाईनच्या कामासाठी खोदून ठेवले त्यानंतर नादुरुस्त अवस्थेत रस्ता ठेवला. त्यावरून एकाच दिवशी पाच दुचाकीस्वार घसरून पडले. अजूनही कॉर्नरच्या रस्त्याचे काम नादुरुस्त अवस्थेत आहे. अधिकाऱ्यांना सांगितल्यास, आपल्या विभागाचे काम नसल्याचे सांगितले जाते. सध्या सोनवणे वस्ती, टॉईन हॉलसमोरील रस्त्याचे काम सुरु आहे, संध्याकाळी वाहतूक कोंडीची समस्या येते. मात्र रस्ता प्रकल्पाचे काम असल्याने सुरु ठेवावे लागणार असे सांगण्यात आले.

> महापालिकेच्या पथ विभागाकडून विविध सेवावाहिन्या टाकण्यासाठी रस्ते खोदाईची कामे शहरात विविध ठिकाणी सुरु आहेत. चिखलीमध्ये सोनवणे वस्ती, मागील काही दिवसांपूर्वी राधा स्वामी सत्संग कॉर्नर या ठिकाणी लाईन टाकण्याचे काम केले.खोदाईनंतर रस्ते वेळेत पूर्ववत करण्यात येत नसल्याने रेंगाळलेल्या कामांचा नागरिकांसह वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.
>
> **- साधना मळेकर, माजी नगरसेविका.**

> लाईन टाकण्यासाठी खोदकाम केल्यास, तत्काळ ते पूर्ववत होणे आवश्यक आहे. तसे कुठल्याच विभागाकडून होत नाही. त्याचा त्रास नागरिकांना, वाहनचालकांना करावा लागतो. रस्ता चिखलमय, वाहतूक कोंडी, अपघाताच्या घटना घडतात. त्यामुळे रस्ता खोदल्यानंतर दुरुस्तीचे कामे तत्काळ करून घेणे आवश्यक आहे.
>
> **- विकास साने, सामाजिक कार्यकर्ते.**

> सोनवणे वस्ती येथील अतिक्रमण काढलेल्या जागेवर स्टॉमवॉटर लाईन,ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम सुरू आहे. यापूर्वी लाईन नव्हत्या,म्हणून गुडघाभर पाणी साचले जात होते. हा चौक मोठा केला जात असल्याने रस्त्याची कामे सुरु आहेत. रस्ता प्रकल्पाचे कामे पावसात थांबवता येत नाहीत.
>
> **- विजय वायकर, फ क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभाग.**

# भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करा; अन्यथा कुत्री कार्यालयात सोडू

## मोशीकरांचा पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढला असून मोठ्यांपासून लहानांपर्यंत अनेकजण कुत्र्यांच्या हल्ल्यात जायबंदी झाले आहेत. कचराकुंड्या, मंदिर परिसर, शाळा पटांगण, सोसायटी, चौक सार्वजनिक ठिकाणांचा भटक्या कुत्र्यांनी ताबा घेतल्याचे दिसून येते. यामुळे नागरिक आणि शालेय विद्यार्थी कमालीचे त्रस्त असून, पालिका प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही या कुत्र्यांचा बंदोबस्त होत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या भटक्या कुत्र्यांचा तत्काळ बंदोबस्त न केल्यास हे भटके कुत्रे पालिका मुख्यालयात सोडू असा इशारा मोशीतील ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते निखील बोऱ्हाडे, रवी जांभुळकर, निलेश बोराटे,तथा मोशी ग्रामस्थांनी महापालिका अधिकाऱ्यांना दिला आहे.

मोशी परिसरातील रोज गॅलक्सी सोसायटी चौक, प्रिस्टीन ग्रीन सोसा.चौक, वाघेश्वर कॉलनी, ऐश्वर्यम हमारा सोसायटी चौक, गंधर्व एक्सलन्स सोसायटी परिसरात भटक्या कुत्र्यांनी उच्छाद मांडला आहे. सोसायटीधारक या भटक्या कुत्र्यांमुळे त्रस्त झाले आहेत. अंधारामध्ये ये-जा करणे मुश्किल झाले आहे. दुचाकीवरून जाताना कुत्री मागे लागतात. जीव मुठीत घेऊन ये-जा करावी लागते, त्यामुळे त्रस्त नागरिकांनी महापालिका अधिकाऱ्यांना वारंवार सांगितले. तरीही भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यात आला नाही.



> पावसाळ्यामध्ये कुत्र्यांच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. त्यामुळे कंट्रोल करताना वेळ लागतो आहे. मोशीतून तक्रारी आलेल्या लवकरच भटक्या कुत्र्यांची नसबंदी करून सोडले जाईल. शहरामध्ये पावसामुळे हे भटक्या कुत्र्यांचे प्रमाण खूप वाढल्याच्या तक्रारी आहेत. एक-एक तक्रार सोडवण्याचे काम सुरु आहे.
>
> - डॉ.अरूण दगडे, मुख्य पशुवैद्यकीय अधिकारी, पिंपरी-चिंचवड महापालिका.

> येत्या आठ दिवसांत भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त संबधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी न केल्यास कुत्री कार्यालयात आणून सोडू, भटक्या कुत्र्यांच्या दहशतीखाली नागरिक वावरत आहेत. कुत्र्यांचा बंदोबस्त करा म्हणून, मागील काही दिवसांपासून संपर्क केला जातोय, उडवाउडवी केली जातेय.
>
> - निखील बोऱ्हाडे, सामाजिक कार्यकर्ते.

> उन्हाळा-पावसाळा कुत्र्यांनी उच्छाद मांडलेला आहे. सोसायटीधारक त्रस्त झाले आहेत. अधिकारी झोपेच सोंग घेऊन आहेत. वारंवार सांगूनही कुठल्याही प्रकारचा कुत्र्यांचा बंदोबस्त केला जात नाही. अनेकदा या कुत्र्यांनी नागरिकांना चावा घेतला आहे. या परिसरात अनेक शाळा आहेत, त्या पालक-पाल्यांना शाळेत जाताना सुध्दा जीव मुठीत घेऊन जावे लागत आहेत. तत्काळ भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा.
>
> - रवी जांभुळकर, सामाजिक कार्यकर्ते.

# चिखली ते घोराडेश्वर पायी कावड यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## श्री भैरवनाथ महाराज मंदिरात सकाळी पुजन व आरती करून यात्रेला प्रारंभ



**पिंपरी | प्रतिनिधी**

श्रावण महिन्यातील आज पहिला सोमवार आणि त्यानिमित्ताने सालाबादप्रमाणे चिखली येथून घोराडेश्वर डोंगरावर जाणारी पारंपरिक पायी कावड यात्रा भक्तिमय वातावरणात मोठ्या उत्साहात पार पडली.

विश्व हिंदू परिषद बजरंग दल चिखली प्रखंड आणि व्यापारी संघटना चिखली यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षीप्रमाणे यंदाही ही यात्रा आयोजित करण्यात आली होती. ग्रामदैवत श्री भैरवनाथ महाराज मंदिरात सकाळी पुजन व आरती करून यात्रेला विधिवत प्रारंभ करण्यात आला.

यात्रेच्या निमित्ताने श्रीघोराडेश्वर महादेवाचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविक टाळ, मृदंग, जयघोष आणि हरहर महादेवच्या घोषात सहभागी झाले होते. संपूर्ण मार्ग भक्तिमय जयघोषांनी आणि "बोल बम" च्या निनादाने गजबजला होता.ही कावड यात्रा चिखली परिसरातील धार्मिक एकोप्याचे व श्रद्धेचे प्रतीक मानली जाते. सुरळीत आणि सुरक्षित मार्गक्रमणासाठी स्वयंसेवक, आयोजक आणि पोलिस प्रशासनानेही योग्य ती तयारी ठेवली होती.

श्रावण सोमवारच्या निमित्ताने घेण्यात आलेली ही यात्रा धार्मिक श्रद्धा, संस्कृती आणि सामाजिक ऐक्य याचे प्रतीक ठरली.

# पिंपरीत धर्मांतर करण्याचा प्रयत्न

## अमेरिकन नागरिकासह एक अटकेत; 16 वर्षीय बालकाचाही समावेश



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी कॅम्पमध्ये धर्मांतर करण्याचा प्रकार समोर आला. याप्रकरणी अमेरिकन नागरिक आणि भारतीय वंशाच्या नागरिकाला पिंपरी पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणात १६ वर्षीय बालकाचाही समावेश आहे. त्याला नोटीस देऊन पोलिसांनी सोडून दिले आहे.

पिंपरी कॅम्पमध्ये अमेरिकन नागरिक आणि भारतीय वंशाचा नागरिक हिंदू धर्मातील नागरिकांचं धर्मपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करत होते. नागरिकांच्या घराबाहेर जाऊन त्यांना आवाज देऊन इतर धर्माविषयी माहिती दिली जात होती. 'तो' किती श्रेष्ठ आहे, हे सांगितलं जातं होतं. 'तो' धर्म वगळता कुठलाच धर्म महत्वाचा नाही. इतर धर्म केवळ कथा आहेत. धर्मपरिवर्तन केल्यास तुम्हाला सुख, समृद्धी, आरोग्य लाभेल, असं नागरिकांना पटवून दिले जात होतं. पैशांचेदेखील अमिष दाखवलं जात होतं.

अखेर याप्रकरणी काही सजग नागरिकांनी थेट पिंपरी पोलीस ठाणे गाठून सर्व प्रकार सांगितला. पिंपरी पोलिसांनी तात्काळ अमेरिकन नागरिक आणि एका भारतीय नागरिकाला अटक केली. अमेरिकन नागरिक हा एक वर्षाच्या मुदतीवर भारतात आलेला आहे.

> रविवारी हा सर्व प्रकार उजेडात आला आहे. काही नागरिक पिंपरी कॅम्पमध्ये धर्मपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करत होते. तेथील नागरिकांनी पिंपरी पोलीस ठाण्यात येऊन तक्रार केली होती. त्यानुसार कारवाई करत अमेरिकन आणि भारतीय वंशाच्या नागरिकाला धर्मांतर करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी अटक केली आहे.
>
> – अशोक कडलग, वरिष्ठ पोलीस निरीक्षक.

# डेंग्यू-मलेरिया प्रतिबंधासाठी महापालिकेची धडक कारवाई

## आरोग्य विभागाकडून नागरिकांचे विविध माध्यमातून केले जात आहे प्रबोधन

**पिंपरी | प्रतिनिधी**

डेंग्यू आणि मलेरियासारख्या आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आरोग्य विभागाच्या वतीने डास निर्मूलनाच्या उपाययोजना अधिक तीव्र करण्यात आल्या आहेत. महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे आणि उप आयुक्त सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ही व्यापक मोहीम राबवण्यात येत आहे.

औषध फवारणीसह घरांची व कंटेनर तपासणी, भंगार दुकाने, बांधकामस्थळांची पाहणी, तसेच जनजागृती आणि दंडात्मक कारवाई यावर भर देण्यात येत आहे. डेंग्यू आणि मलेरियासारख्या आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आरोग्य विभागाच्या वतीने डास निर्मूलनाच्या उपाययोजना अधिक तीव्र करण्यात आल्या आहेत.

डासांपासून असा करा बचाव : - आठवड्यातून एक दिवस 'कोरडा दिवस' पाळा. - साचलेले पाणी काढून टाका. - फुलदाणी, टाकी, टायर, प्लास्टिक वस्तूंमध्ये पाणी साचू देऊ नका.




### महानगरपालिकेच्या आठही क्षेत्रीय कार्यालयांमार्फत समन्वय साधून करण्यात आली कारवाई

- **घरांची तपासणी :** एकूण ६ लाख १४ हजार ८५५ घरांची तपासणी करण्यात आली असून त्यापैकी १० हजार ६०७ घरांच्या परिसरात डास उत्पत्तीसाठी पोषक वातावरण असल्याचे आढळून आले
- **कंटेनर तपासणी :** ३२ लाख ५४ हजार ७३८ कंटेनरपैकी ११ हजार ५१२ कंटेनरमध्ये डास उत्पत्तीसाठी पोषक वातावरण असल्याचे आढळून आले.
- **भंगार दुकाने –** १३८५ भंगार दुकानांची तपासणी करण्यात आली.
- **बांधकाम स्थळे –** १७३४ बांधकाम स्थळांची तपासणी करून त्यामध्ये अस्वच्छता व पाणी साचल्याचे निदर्शनास आले.
- **नोटीस व दंड –** ३ हजार ६१२ ठिकाणी नोटीस बजावण्यात आल्या असून ७३९ नागरिक व आस्थापनांवर थेट दंडात्मक कारवाई करत २६ लाख २७ हजार इतकी दंडाची रक्कम वसूल करण्यात आली.

### डेंग्यू प्रतिबंधासाठी विविध जनजागृती उपक्रम

- नियमित औषध फवारणी
- घरोघरी माहितीपत्रकांचे वितरण
- शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी जनजागृती प्रशिक्षण
- प्रभागस्तरावर विशेष जनजागृती कार्यक्रम
- सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता मोहिमा

> पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून डेंग्यू मलेरियाचा नायनाट करण्यासाठी जनजागृती करण्याबरोबरच, डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी औषध फवारणी, तपासण्या आणि आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येत आहेत. नागरिकांनी या उपक्रमात सहकार्य करून आपल्या परिसरातील स्वच्छता राखून या व्यापक मोहिमेस सहकार्य करावे.
>
> - शेखर सिंह ,आयुक्त,पिंपरी चिंचवड महानगरपालिका

> डेंग्यू आणि मलेरियाचा प्रसार रोखण्यासाठी महापालिकेकडून सर्व स्तरांतून उपाययोजना केल्या जात असून, नागरिकांनी देखील स्वच्छता राखावी तसेच आठवड्यातून एक दिवस हा कोरडा दिवस म्हणून पाळावा तसेच डेंग्यू सदृश्य लक्षणे दिसल्यास नजीकच्या सरकारी रुग्णालयशी त्वरित संपर्क साधावा.
>
> - विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, महानगरपालिका

> डेंग्यू मलेरियाचा प्रतिबंध करण्यासाठी आरोग्य विभागाकडून औषध फवारणी बरोबरच जनजागृती देखील करण्यात येत असून, नागरिकांनी आपला परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी महापालिकेस सर्वतोपरी सहकार्य करावे
>
> - सचिन पवार ,उप आयुक्त, आरोग्य विभाग ,महानगरपालिका

# आयटी पार्कमध्ये वाहतूक कोंडीचे दहा 'हॉट स्पॉट', पोलिस आयुक्त अन् आयटी कर्मचाऱ्यांकडून संयुक्त पाहणी

## हिंजवडीतील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्त आणि आयटी कर्मचाऱ्यांनी कोंडी होणाऱ्या ठिकाणांची संयुक्त पाहणी केली

**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड | हिंजवडीतील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्त आणि आयटी कर्मचाऱ्यांनी कोंडी होणाऱ्या ठिकाणांची संयुक्त पाहणी केली. यामध्ये आयटी पार्कमधील हिंजवडी, माण आणि वाकड भागातील १० ठिकाणे वाहतूक कोंडीचे हॉटस्पॉट निश्चित केलेत. त्यावर पुढील तीन आठवड्यात उपाययोजना राबवल्या जाणार आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडीतून सुटका मिळेल,अशी अपेक्षा आयटी कर्मचाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत अधिवेशन कालावधीत बैठक पार पडली. त्यानंतर हिंजवडी आयटी पार्क परिसरात होणाऱ्या वाहतूक कोंडीवर उपाययोजना करण्यासाठी विविध प्रयत्न सुरु आहेत.

त्यानुसार पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, अतिरिक्त पोलीस आयुक्त सारंग आव्हाड, यांच्या प्रमुख उपस्थितीत हिंजवडी परिसरात पाहणी दौरा आयोजित केला होता. या दौऱ्यात वाहतूक कोंडी होणारी प्रमुख ठिकाणे पाहणी करून स्थानिक नागरिकांच्या सहभागाने योग्य उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले.

हिंजवडी आयटी पार्कमधील विविध समस्या सदर्भात मुख्यमंत्र्यांनी प्रशासकीय विभागांना आदेश दिल्याने प्रशासकीय पातळीवर समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. यामध्ये विभागीय आयुक्तांकडून बैठक घेण्यात आली. तर पीएमआरडीए, एमआयडीसी, महानगरपालिका यांच्या माध्यमातून प्रयत्न सुरु आहेत. या अनक्लॉग हिंजवडी मोहिमेतील सदस्य व आयटी कर्मचारी संघटना यांच्याकडून देखील प्रशासनास सर्वतोपरी सहकार्य सुरु आहे.




**वाहतूक कोंडीचे हॉटस्पॉट**

- मधुबन हॉटेल चौक
- शेल पेट्रोल पंप चौक (छत्रपती शिवाजी महाराज चौकापूर्वी)
- छत्रपती शिवाजी महाराज चौक
- पांडवनगर चौक
- मानदेवी मंदिर रोड (फेज ३)
- एसईझेड भवन सर्कल
- विप्रो सर्कल, फेज २
- क्रोमा चौक/ॲमस्टरडॅम हॉटेल चौक
- माइंड्ट्री कन्सल्टिंग चौकाजवळील जंक्शन
- भुजबळ चौकातील सेवा रस्ते

> आयटी कर्मचारी व स्थानिक यांच्यासोबत अतिरिक्त आयुक्तांनी संपूर्ण आयटी पार्कचे सर्वेक्षण केले. कोंडीच्या मुख्य जागांची आम्ही माहिती देऊन कोंडी कशी टाळता येईल याबाबत सूचना दिल्या. आयटी पार्कमध्ये सुरळीत प्रवास होणे हीच माफक अपेक्षा आहे. येत्या महिन्याभरात आयटी पार्कमधील प्रवास किमान कोंडीमुक्त व्हावा ही अपेक्षा आहे.
>
> - सचिन लोंढे, अनक्लॉग हिंजवडी

# टाकळी हाजी-कवठे येमाई जिल्हा परिषद गटात निवडणूक रणधुमाळी

## उमेदवारांची मोर्चेबांधणी जोरात, डॉ. सुभाष पोकळे यांची भूमिका गुलदस्त्यात

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी-कवठे येमाई जिल्हा परिषद गटात इच्छुक उमेदवारांनी कंबर कसली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि शिवसेना पक्षातील फाटाफुटीमुळे उमेदवारी निश्चितीचे आव्हान पक्षश्रेष्ठींसमोर उभे ठाकले असून, या गटातील राजकीय समीकरणे जुळवण्यासाठी जोरदार मोर्चेबांधणी सुरू आहे.

गेल्या पंधरा दिवसांत शिरूर तालुक्यातील अनेक इच्छुकांनी आयोजित केलेल्या आखाड पार्ट्यांनी राजकीय वातावरण तापले आहे. विशेषत: टाकळी हाजी-कवठे येमाई गटात माजी आमदार पोपटराव गावडे यांचे सुपुत्र राजेंद्र गावडे यांनी आयोजित केलेल्या आखाड पार्टीनं लक्ष वेधलं आहे. या कार्यक्रमाला उपस्थित जनसमुदाय पाहता राजेंद्र गावडे यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) कडून उमेदवारी निश्चित मानली जात आहे.

दुसरीकडे, टाकळी हाजीचे माजी सरपंच आणि माजी पंचायत समिती सदस्य अरुणा घोडे यांचे पती दामू घोडे हे राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट) कडून इच्छुक आहेत. तसेच, माजी पंचायत समिती सदस्य डॉ. सुभाष पोकळे हे माजी खासदार शिवाजी आढळराव पाटील यांचे समर्थक म्हणून इच्छुक असले, तरी त्यांची भूमिका अद्याप गुलदस्त्यात आहे. शिवाजी आढळराव यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केल्याने गावडे आणि पोकळे यांच्यातील राजकीय समीकरणांची चर्चा जोरात आहे. गेली पन्नास वर्षे टाकळी हाजी-कवठे येमाई हा जिल्हा परिषद गट राष्ट्रवादी कॉंग्रेसचा (अजित पवार गट) बालेकिल्ला मानला जातो. माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली माजी आमदार पोपटराव गावडे यांचे या गटावर वर्चस्व आहे. उमेदवारांच्या मोर्चेबांधणीने गटातील राजकीय वातावरण तापले असून, येणाऱ्या काळात कोण बाजी मारणार, हे पाहणे औत्सुक्यपूर्ण ठरणार आहे.



### राष्ट्रवादीचा बालेकिल्ला आणि इच्छुकांची गर्दी

» गेली पन्नास वर्षे टाकळी हाजी-कवठे येमाई हा जिल्हा परिषद गट राष्ट्रवादी कॉंग्रेसचा (अजित पवार गट) बालेकिल्ला मानला जातो. माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली माजी आमदार पोपटराव गावडे यांचे या गटावर वर्चस्व आहे. मात्र, यंदा इच्छुकांची संख्या पाहता स्पर्धा तीव्र आहे. कवठे येमाईचे उद्योजक बाळासाहेब डांगे, शेतकरी संघटनेचे ज्ञानेश्वर (माऊली) ढोमे आणि भाजपचे नेते सावित्रा थोरात हे देखील या निवडणुकीच्या आखाड्यात उतरले आहेत. पंचायत समिती निवडणुकीसाठी दामोधर दाभाडे, राहुल जगताप, माजी सदस्य वासुदेव जोरी, बाबाजी निचित, सागर दंडवते, माजी सरपंच योगेश थोरात, दीपक रत्नपारखी आणि वसंतराव पडवळ यांची नावे चर्चेत आहेत.

### उमेदवारांचा जनसंपर्क आणि विकासकामांचा डंका

» इच्छुकांनी गाठीभेटी, वाढदिवस, विवाहसोहळे, दशक्रिया विधी यांसारख्या कार्यक्रमांना उपस्थिती वाढवली आहे. राजेंद्र गावडे यांनी माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या माध्यमातून गटात निधी आणण्याचे प्रयत्न तीव्र केले असून, माजी आमदार पोपटराव गावडे, स्व. सोनभाऊ गावडे आणि सुनिता गावडे यांच्या विकासकामांच्या जोरावर त्यांनी संघटन बांधणी सुरू केली आहे. दामू घोडे, अरुणा घोडे, डॉ. सुभाष पोकळे, सावित्रा थोरात आणि माऊली ढोमे यांनीही मागील दहा वर्षांत जनतेशी जवळीक साधली आहे. या गटात येणाऱ्या निवडणुकीत जनता कोणाला कौल देणार, याची उत्सुकता सर्वत्र आहे.

### रणधुमाळीला सुरुवात

» या गटातील राजकीय चुरस आणि पक्षांतर्गत बदलांमुळे यंदाची निवडणूक अटीतटीची होणार आहे. उमेदवारांच्या मोर्चेबांधणीने गटातील राजकीय वातावरण तापले असून, येणाऱ्या काळात कोण बाजी मारणार, हे पाहणे औत्सुक्यपूर्ण ठरणार आहे.

---

# आरोग्यसेवेतील पदांची 'संगीत खुर्ची'; महत्त्वाच्या पदांवर एकही अधिकारी पूर्ण वेळ कार्यरत नाही

## विभागाचे कामकाज विस्कळीत झाल्याचे कर्मचाऱ्याकडून सांगितले जात आहे

**पुणे | प्रतिनिधी**

सार्वजनिक आरोग्य विभागात सध्या पदभारांची संगीत खुर्ची सुरू असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. आरोग्य विभागाच्या महत्त्वाच्या पदांवर एकही अधिकारी पूर्ण वेळ कार्यरत नाही. सध्या विभागातील पदे 'अतिरिक्त कार्यभार' पद्धतीने उपलब्ध अधिकाऱ्यांवर तात्पुरत्या स्वरूपात सोपवली जात आहेत.

सार्वजनिक आरोग्य विभागात उपसंचालक, अतिरिक्त संचालक, सहायक संचालक ही महत्त्वाची पदे सध्या रिक्त आहेत. गेल्या महिनाभरात अधिकाऱ्यांच्या पदभारामध्ये सातत्याने बदल करण्यात येत आहेत. एकाच अधिकाऱ्याकडे दोन-तीन विभागांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. परिणामी, विभागाचे कामकाज विस्कळीत झाल्याचे कर्मचाऱ्यांकडून सांगितले जात आहे.

पुण्यात कुटुंबकल्याण व साथरोग विभागांसाठी स्वतंत्र कार्यालये आहेत. कुटुंबकल्याण कार्यक्रम, माता-बाल आरोग्य, लसीकरण, जननी सुरक्षा योजना, प्रधानमंत्री मातृवंदना योजना, बाल आरोग्य कार्यक्रम यांसाठी स्वतंत्र अतिरिक्त संचालक असणे आवश्यक असते.

डॉ. संदीप सांगळे यांच्याकडे अतिरिक्त संचालकपदाचा तात्पुरता कार्यभार सोपविण्यात आला आहे. त्यांच्यावरच जलजन्य आजार, मलेरिया, फायलेरिया, क्षयरोग व कुष्ठरोग विभागांच्या दोन्ही सहसंचालकपदांचाही अतिरिक्त कार्यभार आहे.

डॉ. बबिता कमलापूरकर यांच्याकडे आधी अतिरिक्त संचालकपदाची जबाबदारी होती. आता त्यांच्याकडे आरोग्य माहिती व आकडेवारी विभागातील उपसंचालक म्हणून पद देण्यात आले आहे. काही अधिकाऱ्यांना वर्ष पूर्ण होण्याआधीच दुसरीकडे हलविण्यात आले आहे. काही अपात्र अधिकाऱ्यांना बढतीच्या प्रतीक्षेत वरिष्ठ पदांचा कार्यभार देण्याची प्रथा सुरू असल्याचे आरोपही होत आहेत.



### गोंधळ उडवणारी पदभरती आणि बदल्या

» साथरोग विभागांतर्गत एकत्रित रोगसर्वेक्षण, कीटकजन्य रोगनियंत्रण, जलजन्य व विषाणुजन्य आजार, क्षयरोग व कुष्ठरोगासाठी स्वतंत्र अधिकारी असणे गरजेचे आहे. परंतु, हे अधिकारीही तात्पुरत्या स्वरूपात कार्यरत असून, अनेक पदांवर अतिरिक्त कार्यभार देऊनच कामकाज चालविले जात आहे.

> आरोग्य विभागातील सर्व कार्यक्रमांसाठी लवकरच पूर्णवेळ अधिकारी नियुक्त केले जातील. येत्या 15 ऑगस्टपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण होईल. हे अधिकारी सर्वसामान्यांसाठी सहज उपलब्ध राहतील.
>
> **- प्रकाश आबिटकर, सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंबकल्याणमंत्री**